महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

सन १९४६ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ११

# मध्य प्रांत व वऱ्हाड निवासव्यवस्था भाड्याने देण्याबाबत विनियमन अधिनियम, १९४६

(दिनांक १७ मे १९८८ पर्यंत सुधारलेला)

CENTRAL PROVINCES AND BERAR
ACT No. XI OF 1946

# THE CENTRAL PROVINCES AND BERAR REGULATION OF LETTING OF ACCOMMODATION ACT, 1946

(*As modified upto the 17 May 1988*)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित

१९८८

[ किंमत—एक रुपया ]

# मध्य प्रांत व वऱ्हाड निवासव्यवस्था भाड्याने देण्याबाबत विनियमन अधिनियम, १९४६

अनुक्रमणिका


| उद्देशिका<br>कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. .. .. .. | १ |
| २ | भाड्याने व पोट-भाड्याने देणे इत्यादींचे विनियमन .. .. .. | १ |
| ३ | आदेश चालू राहणे .. .. .. .. .. .. | २ |
| ४ | आदेशांचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न, इत्यादी .. .. .. .. | २ |
| ५ | अपराधांची दखल .. .. .. .. .. .. | २ |
| ६ | इतर अधिनियमितीशी विसंगत असलेल्या आदेशांचा परिणाम .. .. | २ |
| ७ | दिवाणी न्यायालये व महसूल अधिकारी यांची अधिकारिता .. .. . | २ |
| ८ | शिक्षा .. .. .. .. .. .. .. .. | २ |
| ९ | आदेशांच्या अनुपालनाची निश्चिती करण्यासाठी अधिकार .. .. .. | २ |
| १० | या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण .. .. .. .. | ३ |

## सन १९४६ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ११*

[मध्य प्रांत व वऱ्हाड निवासव्यवस्था भाडयाने देण्याबाबत विनियमन अधिनियम, १९४६]

[या अधिनियमास गव्हर्नर जनरल यांची दिनांक २८ सप्टेंबर १९४६ रोजी अनुमती मिळाली; ही अनुमती, मध्य प्रांत व वऱ्हाड राजपत्र, असाधारण, यामध्ये दिनांक १ ऑक्टोबर १९४६ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली.]

†[मध्य प्रदेशातील] निवासव्यवस्था भाड्याने व पोट-भाड्याने देण्याबाबत विनियमन करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम— उद्देशिका

ज्याअर्थी निवासव्यवस्था भाडयाने देणे किंवा पोट-भाडयाने देणे आणि यात यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या अन्य अनुषंगिक बाबी यांबाबत विनियमन करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी याद्वारे पुढील-प्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे—

१. (१) या अधिनियमास, मध्य प्रांत व वऱ्हाड निवासव्यवस्था भाड्याने देण्याबाबत विनियमन अधिनियम, १९४६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो [1][[2][महाराष्ट्र राज्यातील] संपूर्ण विदर्भ प्रदेशास] लागू आहे.

‡[(३) राज्य शासन, अधिसूचनेअन्वये याबाबतीत नेमील अशा तारखेला तो अंमलात असण्याचे बंद होईल.]

२. राज्य शासनास, ते अधिसूचनेअन्वये निदेशित करील अशा क्षेत्रांना लागू असेल अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाअन्वये कोणतीही निवासव्यवस्था किंवा निवासव्यवस्थांचा कोणताही वर्ग—मग तो निवासी असो किंवा निवासेतर असो, सुसज्ज असो किंवा विनासुसज्ज असो आणि भोजनव्यवस्थेसह असो किंवा भोजनव्यवस्थेविना असो—भाड्याने व पोट-भाड्याने देण्याबाबत विनियमन करण्याकरिता आणि विशेषत: पुढील बाबींकरिता तरतूद करता येईल :— भाड्याने व पोट-भाड्याने देणे इत्यादींचे विनियमन.

(अ) अशा निवासव्यवस्थेसाठी असलेल्या भाड्यांवर एकतर सर्वसाधारणपणे किंवा विनिर्दिष्ट व्यक्तींना अथवा व्यक्तींच्या वर्गांना किंवा विनिर्दिष्ट परिस्थितीत भाड्याने देण्यात येईल त्यावेळी नियंत्रण ठेवण्याकरिता;

(ब) विनिर्दिष्ट परिस्थितीत अशा निवासव्यवस्थांतून भाडेकरूंना किंवा पोट-भाडेकरूंना काढून टाकण्यास प्रतिबंध करण्याकरिता;

(क) अशी निवासव्यवस्था एकतर, सर्वसाधारणपणे किंवा विनिर्दिष्ट व्यक्तींना अथवा व्यक्तींच्या वर्गांना किंवा विनिर्दिष्ट परिस्थितीत भाड्याने देण्यास भाग पाडण्याकरिता; आणि

(ड) पूर्वोक्त बाबींपैकी कोणतीही बाब विनियमित करण्याच्या दृष्टीने कोणतीही माहिती किंवा आकडेवारी गोळा करण्याकरिता.

---

*उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता मध्य प्रांत व वऱ्हाड राजपत्र, दिनांक २३ ऑगस्ट, १९४६, भाग दोन, पृ. ९४ पहा.

विधानसभेतील कामकाजवृत्तासाठी, मध्य प्रांत व वऱ्हाड विधानसभा कामकाजवृत्त, १९४६, खंड दोन, पृष्ठे १०७, ५१४ ते ५३७ आणि ५५७ ते ५७४ पहा.

†विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "मध्य प्रांत व वऱ्हाड" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१. सन १९५६ चा मुंबई (विदर्भ प्रदेश) विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) अधिनियम, कलम ४ (१) अन्वये "मध्य प्रदेशास" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, कलम ४ (१) अन्वये "मुंबई राज्यातील" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

‡सन १९४७ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ३९, कलम २ अन्वये कलम १ चे पोट-कलम (३) बदलीदाखल करण्यात आले.

आदेश चालू राहणे. ३. कलम २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात भारत संरक्षण नियमांतील नियम ८१ च्या पोटनियम (२) अन्वये काढण्यात आलेला जो आदेश, सरकारी राजपत्रात अधिसूचित करण्यात येऊन या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात होता तो प्रत्येक आदेश, राज्य शासनाला, उक्त कलमान्वये विधिग्राह्यपणे जेथवर काढता आला असता तेथवर अंमलात असण्याचे चालू राहील. आणि राज्य शासन या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये त्यांचे अधिक्रमण करीतोपर्यंत किंवा त्यात फरबदल करीतोपर्यंत तो आदेश त्या कलमान्वये काढण्यात आला आहे असे मानण्यात येईल व अशा कोणत्याही आदेशान्वये केलेली कार्यवाहीदेखील सक्षम प्राधिकारी अधिक्रमण करीतोपर्यंत अथवा फेरबदल करीतोपर्यंत चालू राहील.

आदेशांचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न, इत्यादी. ४. कलम २ अन्वये केलेल्या किंवा केला असल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करण्याचा कोणताही प्रयत्न हा, त्या आदेशाचे उल्लंघन असल्याचे मानण्यात येईल.

अपराधांची दखल. ५. कोणतेही न्यायालय, अशा अपराधाने पीडित झालेल्या व्यक्तीने किंवा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे लोकसेवक असलेल्या व्यक्तीने अशा अपराधात अंतर्भूत असणाऱ्या तथ्यांबाबत लेखी प्रतिवेदन केल्यावरून असेल त्याखेरीज एरव्ही, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधांची दखल घेणार नाही. १८६० चा ४५.

इतर अधिनियमितींशी विसंगत असलेल्या आदेशांचा परिणाम. ६. कलम २ अन्वये दिलेला किंवा देण्यात आला असल्याचे मानण्यात येणारा कोणताही आदेश, या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीत किंवा या अधिनियमाहून अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या सामर्थ्याने अंमल असणाऱ्या कोणत्याही संलेखात त्या आदेशाशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी परिणामक असेल.

दिवाणी न्यायालये व महसूल अधिकारी यांची अधिकारिता. ७. कोणतेही दिवाणी न्यायालय, न्यायाधिकरण किंवा, कलम २ अन्वये काढण्यात आलेला किंवा काढण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या आदेशान्वये अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकारी किंवा प्राधिकारी याहून अन्य महसूल अधिकारी यांना, कलम २ मध्य विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात असेल अशा कोणत्याही आदेशान्वये त्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या बाबतीत अपीलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या मार्गे, कोणतीही अधिकारिता असणार नाही.

शिक्षा. ८. कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केले तर, ती व्यक्ती, तीन वर्षांच्या अवधीपर्यंत वाढविता येईल इतकी कैद किंवा दंड किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

आदेशांच्या अनुपालनाची निश्चिती करण्यासाठी अधिकार. *[९. कलम २ अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशान्वये कोणत्याही प्राधिकरणास, उक्त आदेशात तशी तरतूद असेल तर, अशा आदेशाचे अनुपालन करून घेण्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी वा त्याचे दोषनिरसन करण्यासाठी किंवा अशा अधिकाराचा प्रभावी वापर करण्यासाठी, अशा प्राधिकरणाच्या मते वाजवीरीत्या आवश्यक असेल अशी उपाययोजना करता येईल किंवा करण्याची तजवीज करता येईल व अशा बलाचा वापर करता येईल किंवा करण्याची तजवीज करता येईल.

---

*सन १९४७ चा मध्यप्रदेश व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ३९, कलम ३ अन्वये कलमे ९ आणि १० जादा दाखल करण्यात आली.

१०. या अधिनियमाच्या अनुरोधाने किंवा त्याअन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या अनुरोधाने सद्‌भावाने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तींविरुद्ध कोणताही दावा, अभियोग किंवा अन्य कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही. या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.

(२) या अधिनियमाच्या अनुरोधाने किंवा त्याअन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या अनुरोधाने सद्‌भावाने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीने झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणतेही नुकसानाबद्दल राज्य शासनाविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

A-544—2

शामुना—ए-५४४-भासंमुं-६-८८–१,५३०—पीसी ४*